# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 21-09-2021

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2021-09-21 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2021-09-22 | 2021-09-23 | 2021-09-24 | 2021-09-25 | 2021-09-26 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 75.0 | 28.6 | 21.4 | 15.5 | 6.4 |
| कमाल तापमान (अं.से) | 25.4 | 25.2 | 25.7 | 26.3 | 26.6 |
| किमान तापमान (अं.से) | 22.6 | 22.3 | 22.7 | 22.9 | 23.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 94 | 97 | 91 | 88 | 85 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 88 | 89 | 83 | 81 | 77 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5.0 | 7.0 | 6.0 | 6.0 | 5.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 357 | 33 | 115 | 270 | 219 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 7 | 7 | 7 | 7 |

### हवामान सारांश / चेतावणी:

रामटेक तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकानिहाय मूल्य वर्धित अंदाजानुसार,पुढील पाच दिवस दिनांक २२ सप्टेंबर २०२१ ते २६ सप्टेंबर २०२१ दरम्यान आकाश अंशतः ढगाळ ते पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आणि दिनांक २३, २४, २५ आणि २६ सप्टेंबर २०२१ रोजी हलका ते मध्यम पाऊस, दिनांक २२ सप्टेंबर २०२१ रोजी जोरदार पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, दिनांक २३ सप्टेंबर रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात वर्तविण्यात आली आहे.

### कृषि सल्ला:

कपाशी, सोयाबीन, तूर, मुग व उडीद, भाजीपाला, पपई, केळी, संत्रा, मोसंबी, लिंबू च्या फळबागा आणि इतर पिकामध्ये पावसाचे पाणी साचले असल्यास तत्काळ निचरा करावातसेच पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेता पावसाचे पाणी साचून राहणार नाही यासाठी खबरादारीच्या उपाययोजना कराव्या. परिपक्व अवस्थेतील काढणी केलेल्या उडीद व लवकर पेरणी केलेल्या/परिपक्व झालेल्या सोयाबीन पिकाची काढणी केलेली असल्यास कापणी केलेले पिक शेतातील उंचवट्यावर साठवावे आणि मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या साहाय्याने झाकून ठेवावे तसेच स्थानिक हवा

### संक्षिप्त संदेश सल्ला:

शेतकरी, शेत मजूर यांनी नदी नाल्यावरून पाणी वाहत असल्यास रस्ता ओलांडतांना घाई करू नये तसेच आपली इतर जनावरे वाहत्या पाण्यातून जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| उडीद | उडीद काढणी व मळणी व्यवस्थापन: परिपक्व अवस्थेत असलेल्या वेळेवर पेरणी केलेल्या उडीद पिकाची काढणी तत्काळ करून घ्यावी तसेच कापणी केलेले पिक शेतातील उंचवट्यावर साठवावे आणि मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावे.उडीद पिकाच्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचले असल्यास तत्काळ अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| कपाशी | कपाशी रोग व्यवस्थापन: कपाशीच्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा तात्काळ निचरा करावा. खबरदारीचा उपाय म्हणून कपाशीतील आंतरिक बोंड सड रोगाच्या व्यवस्थापनासाठी सुरुवातीच्या बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेमध्ये कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्लु.पी. (२५ ग्रॅम)+ स्ट्रेप्टोसायक्लीन (१ ग्रॅम) यांचे मिश्रण प्रति १० लिटर पाण्यात मिसळून सध्याच्या पावसाच्या उघडिपीनंतर स्वच्छ हवामान परिस्थिती बघून फवारणी करावी. कपाशीमध्ये आकस्मिक मर रोगाची लक्षणे दिसून आल्यास प्रादुर्भाव ग्रस्त शेतामध्ये व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्यूपी. २० ग्राम + १०० ग्राम युरिया प्रती १० लिटर पाणी पिकाला वाफसा आल्यानंतरआळवणी करावी. |
| तूर | तुरीच्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा तात्काळ निचरा करावा. |
| मोसबी | संत्रा मोसंबीच्या पावसाळ्यातील फळ गळ व्यवस्थापनासाठी उपाययोजना: संत्रा व मोसंबी फळबागेमध्ये पावसाचे पाणी साचल्यास तत्काळ अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.झाडावरील पानसोट काढून टाकावेत. बाग तण विरहित ठेवावी. सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाच्या उघडिपीनंतर जिबरेलिक आम्ल १.५ ग्राम + कॅल्शिअम नायट्रेट १.५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी केल्यानंतर पंधरा दिवसांनी २-४-डी किंवा एनएए १.५ ग्राम + मोनोपोटाशियम फॉस्फेट (०: ५२: ३४) १.५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात फवारणी करावी. वाढ होणाऱ्या आंबिया बहराच्या संत्रा मोसंबी फळ झाडांसाठी प्रत्येक झाडाला ५० ग्राम फेरस सल्फेट ($FeSO_4$) + ५० ग्राम झिंक सल्फेट ($ZnSO_4$) व ५ किली चांगले कुजलेले शेणखत किंवा गांडूळ खत |
| सोयाबीन | सोयाबीन काढणी व मळणी व्यवस्थापन:सोयाबीन च्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचले असल्यास अतिरिक्त पाण्याचा तात्काळ निचरा करावा. ज्या शेतकरी बांधवांनी लवकर परिपक्व होणारे वाण जसे कि, जेएस- ९५-६०, जेस- २०-३४, जेएस- ९३०५, एनआरसी- १३०,एनआरसी- १३८ इत्यादी यांची लागवड केली असल्यास परिपक्व अवस्थेत असलेल्या पिकाची तात्काळ स्थानिक हवामानाचा अंदाज घेऊन काढणी करावी व काढणी केलेले पिकशेतातील उंचवट्यावर साठवावे आणि मळणी ची कामे शक्य नसल्यास ताडपत्रीच्या साहाय्याने झाकून ठेवावे. दाने भरण्याच्या अवस्थेमध्ये सततच्या पावसामुळे सोयाबीन च्या गुणवत्तेची हानी होऊ शकते तसेच परिपक्व शेंगा मधील दाण्यास अंकुर येऊ शकतात त्यामुळे (परिपक्व अवस्था येताच) पावसाची उघडीप पाहून तत्काळ काढणी करून घ्यावी. सोयाबीन चे कापणी केलेले पि |
| भात | धान करपा रोग व्यवस्थापन: करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा आयसोप्रोथिलेन ४० % ई.सी. @ १५ मि.ली. किंवा टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. धान कडा करपा रोग व्यवस्थापन: कडाकरपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी स्ट्रेप्टोसायक्लीन @ १ ते १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. धान पर्णकोष करपा रोग व्यवस्थापन:पर्णकोष करपा रोगाच्याव्यवस्थापनासाठी टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मि.ली. किंवा प्रोपिकोनॅझोल २५ ई.सी. @ १० मि.ली. किंवा हेक्झाकोनॅझोल ५ ई.सी. @ २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. धान पर्णकोष कुजव्या रोग व्यवस्थापन: पर्णकोष कुजव्या रोग व्यवस्थापनासाठी, हेक्झाक |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | शेळ्यांमध्ये पावसाळ्यात विशेषतः पोटात जंतूची व परजीवीची संख्या वाढते. त्यासाठी उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सल्ल्यानुसार शेळ्यांना जन्तानाशाकाची मात्र देण्यात यावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| चिकन | कोंबड्यांमध्ये रोग प्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी तुळशीच्या पानाची भुकटी दोन ग्राम प्रती दिवस या प्रमाणे १५ दिवस द्यावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
| --- | --- |
| सामान्य सल्ला | शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्ही शेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडा पाला-पाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून तळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणी किंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे. जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावर आश्रय घ्यावा. विजांच्या बचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण |
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |